जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ४२८ दिनांक - ११/१०/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जबरी चोरी करणारा सराईत ०२ वर्षासाठी तडीपार

लोणीकंद पोलीस स्टेशनकडील जबरी चोरी करणारा सराईत गुन्हेगार सौरभ विलास शिंदे, वय २६ वर्षे रा. फुलगाव ता.हवेली जि.पुणे यांस पोलीस उपायुक्त परिमंडळ ०४, पुणे शहर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(अ)(ब)प्रमाणे संपुर्ण पुणे जिल्ह्यातुन ०२वर्षा करीता तडीपार केले आहे.

लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतील फुलगाव, तुळापुर, पेरणे फाटा, लोणीकंद तसेच आसपासच्या भागात जबरी चोरी करुन लोकांमध्ये दहशत निर्माण करणारा तसेच हॉटेल व्यावसायिक तसेच स्थानिक व सामान्य नागरीकांना वारंवार त्रास देणा-या, लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करणा-या सराईत गुन्हेगारांच्या कृत्यामुळे लोकांच्या मनातुन कायद्याविषयी संभ्रम निर्माण होवु नये,तसेच सदर सराईत गुन्हेगारावर कायद्याचा वचक बसावा या उद्देशाने सदर इसमांवर सहा. पोलीस आयुक्त श्रीमती प्रांजली सोनवणे, लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पंडीत रेजितवाड यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार प्रशांत कापुरे, सागर कडु, शुभम सातव यांनी सदर सराईत इसम याचे वर दाखल गुन्ह्यांचा अभिलेख तपासुन सदर इसमास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे तडीपार करणेबाबत पोलीस उपायुक्त परि-४ पुणे श्री. हिंमत जाधव यांना प्रस्ताव पाठविला असता, पोलीस उपायुक्त परि-४ पुणे श्री.हिंमत जाधव यांनी सदर सराईतास पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन ०२ वर्षाकरीता तडीपार कारवाई केली आहे.

सदरची कामगिरी मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उपायुक्त श्री.हिंमत जाधव, मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पंडीत रेजितवाड यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार प्रशांत कापुरे, पोलीस सागर कडु,शुभम सातव यांनी केली आहे.

**सदरचा तडीपार इसम हा पुणे जिल्ह्याचे परिसरात आढळुन आल्यास त्याची माहीती लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर संपर्क क्र. ९५२७०६९१०० यावर कळविण्याचे आवाहन लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री पंडीत रेजितवाड यांनी केले आहे.**